04-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/03/2025 11:12 PM Page 1



## निवडक

### कीर्ती विद्यालय शिवोलीतर्फे मेळाव्यानिमित्त विविध स्पर्धा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. ३ :** कीर्ती विद्यालय शिवोलीतर्फे बाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात शिवोली गावातील सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा व सरकारी प्राथमिक शाळा,ओशेल – चोपडे, कीर्ती विद्यालय (पूर्व प्राथमिक विभाग), कीर्ती विद्यालय (प्राथमिक विभाग) शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमात विविध खेळ व स्पर्धा, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडाच्या शिक्षिका प्रगती चणेकर व सीमा गोसावी व सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल – चोपडेच्या शिक्षिका विद्या साळगांवकर व कुमारी कॅथरीन गॉडद यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा वाडकर यांनी सर्वांना संबोधले. प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ देण्यात आले.तसेच शिक्षिका रेश्मा गोलतेकर यांनी बाल मेळाव्याचे महत्त्व सर्वांना पटवून दिले. त्यानंतर अल्पोपहार घेऊन विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा आणि खेळ यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. मुलांसाठीआग काड्या आगपेटीत भरणे ,मणी गुंथने, आकार जुळवणे ,पाण्याची बाटली भरणे.डोक्यावर पुस्तक बॅलन्स करणे, लंगडी घालणे यासारखे खेळ व स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत विजय मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे आहेत: आगपेटीत काड्या भरणे – प्रथम – तस्मिया खान,सरकारी प्राथमिक शाळा,बामणवाडा, द्वितीय – नायरा नार्वेकर सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल–चोपडे, तृतीय – प्रिया कुमारी सरकारी प्राथमिक शाळा बामणवाडा.लंगडी – प्रथम – सिद्धी समीर काकतकर सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल –चोपडे, द्वितीय – प्रतिज्ञा निसाद, सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा, तृतीय –पुष्पक परिडा सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल– चोपडे, बाटलीत पाणी भरणे – प्रथम – तस्मिया अहमद खान सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा, द्वितीय – दुर्गा कुमारी सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल –चोपडे, तृतीय – नमः शिवाय शर्मा सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा. पुस्तक बॅलन्स करणे – प्रथम –तस्मिया खान सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा, द्वितीय – नमः शिवाय शर्मा सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा, तृतीय – रोशनी कुमारी सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा.

दोरीत मणी गुंथने – प्रथम – तस्मिया खान सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा, द्वितीय – सिद्धी समीर काकतकर, सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल–चोपडे, तृतीय – प्रिया कुमारी सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा. आकार जुळवणे – प्रथम प्रतिज्ञा निसाद, सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा, द्वितीय – पुष्पक परिडा, सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल– चोपडे, तृतीय – शिवानी कुमारी, सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा. कीर्ती विद्यालय (पूर्व प्राथमिक विभाग)संगीत खुर्ची – प्रथम– गरीष्मा साळगावकर, द्वितीय– वीर च्यारी, तृतीय – वियांशी सीमेपुरुषकर.पासिंग द बॉल – प्रथम – निहिरा प्रसिद्धी, द्वितीय–पुनिश सिमेपुरुषकर, तृतीय – अयात चोपदार. मणी गुंथणे – प्रथम– गरीष्मा साळगावकर, द्वितीय – श्रियान केसरकर, तृतीय –धिरज धानी. कीर्ती विद्यालय (प्राथमिक विभाग) स्पर्धा –लंगडी घालणे पहिली ते दुसरी – प्रथम – रीना लागवे, द्वितीय– शुहम कुमार, फैजान शेख. तिसरी ते चौथी – प्रथम– सुहानी वळवईकर, द्वितीय– इब्रान शेख, तृतीय– रिषभ बडा स्पर्धा –बॅलन्सिंग द बुक – पहिली ते दुसरी – प्रथम – फैजान शेख, द्वितीय अनिसा टोपो, तृतीय–सक्षम लागवे.तिसरी ते चौथी – प्रथम– साशा आगरवाडेकर, द्वितीय– समर्थ वाकुडे, तृतीय–मयंक चोडणकर शाळेतील शिक्षकांनी आणि पाहुण्यांनी मुलांच्या कलागुणांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढावा आणि त्यांना विविध कौशल्ये आत्मसात करता यावीत, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या खेळाच्या वस्तू दाखवण्यात आल्या. सर्व विद्यार्थी व पालकांसाठी मातृ–पितृ पूजन आयोजित करण्यात आले होते. संतोष कोरकणकर समाजसेवक, हरमल यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली आणि उपस्थित सर्वांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. व्यासपीठावर शाळेचे अध्यक्ष श्री राजेश वायंगणकर, शाळेचे व्यवस्थापक श्री परमानंद मांद्रेकर, शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका व कार्यक्रमाच्या संयोजिका संगीता वायगणकर हजर होते. कार्यक्रम यशस्वीरित्या करण्यास शाळेतील प्रशिक्षणार्थी, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठा सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या संयोजिका संगीता वायंगणकर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

# भारत-ऑस्ट्रेलियामध्ये आज महामुकाबला

## रोहितसेना २०२३च्या विश्वकपातील पराभवाचा वचपा काढण्यासाठी सज्ज : आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५






**दुबई, दि. ३ :**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील उपांत्य फेरीत २०२३ वनडे वर्ल्ड कप फायनलिस्ट टीम इंडिया विरुद्ध ऑस्ट्रेलिया आमनेसामने असणार आहे. उभयसंघातील हा सामना उद्या मंगळवारी ४ मार्च रोजी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये होणार आहे. टीम इंडियाने साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात न्यूझीलंडचा धुव्वा उडवत पराभवाचा वचपा काढला. त्यानंतर आता टीम इंडियाचा निशाण्यावर कांगारुं आहेत. कांगारुंना लोळवत वनडे वर्ल्ड कप फायनल २०२३ पराभवाचा वचपा काढण्यासाठी रोहितसेना सज्ज झाली आहे.

एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये भारताला आपल्या भूमीवर पराभवाचा बदला घेण्याची संधी आहे. अजिंक्य टीम इंडियाला अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला. कर्णधार रोहित शर्मा, शुबमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल यांच्याकडून संघाला मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. रोहितला अजूनही साजेशी खेळी करता आलेली नाही. कोहलीने पाकिस्तानविरुद्ध सामन्यात महत्त्वपूर्ण शतकी खेळी करून सामना सहज जिंकून दिला होता. गिलनेही बांगलादेशविरुद्ध अर्धशतकी खेळी केली होती. रविवारी झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात शानदार अर्धशतकी खेळी करून सामना जिंकण्यात मोठी भूमिका बजाविली होती.

ऑस्ट्रेलियाचे अनेक स्टार खेळाडू दुखापतीमुळे किंवा वैयक्तिक कारणांमुळे संघाबाहेर आहेत, तरीही संघ खूप मजबूत आहे. ऑस्ट्रेलियाचे अनेक स्टार खेळाडू दुखापतीमुळे किंवा वैयक्तिक कारणांमुळे संघाबाहेर आहेत, तरीही संघ खूप मजबूत आहे. या संघाने ग्रुप स्टेजमध्ये ३५० हून अधिक धावांचा पाठलाग करून आयसीसी स्पर्धेतील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय नोंदवला आहे.

ऑस्ट्रेलियन संघ पॅट कमिन्स, जोश हेझलवूड आणि मिचेल स्टार्क सारख्या स्टार्सशिवाय खूप मजबूत आहे. २०११ च्या विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताने ऑस्ट्रेलियाचा शेवटचा पराभव केला होता. आयसीसी स्पर्धेच्या बाद फेरीत, त्यानंतर प्रत्येक वेळी भारताला बाद फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

यावेळी परिस्थिती भारताच्या बाजूने आहे. उत्कृष्ट फिरकीपटूंची उपस्थिती हे भारताच्या आत्मविश्वासाचे प्रमुख कारण आहे. स्पर्धेच्या सुरुवातीलाच प्लेइंग इलेव्हनमध्ये ५ फिरकीपटूंचा समावेश करण्याच्या निर्णयामुळे रोहितला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागले.पण, फिरकीपटूंनी स्वत:ला सिद्ध करण्यात कोणतीही कसर सोडली नाही आणि आतापर्यंत भारत अपराजित आहे. तर ग्रुप स्टेजमध्ये ऑस्ट्रेलियाला दक्षिण आफ्रिकेकडून पराभव स्वीकारावा लागला होता.

त्याच मैदानावर खेळण्याचा फायदा भारताला मिळतो असे नाही. त्यापेक्षा भारतीय संघाने सामन्यानंतरच्या कामगिरीत बरीच सुधारणा केली आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या अखेरच्या गट सामन्यात ३० धावांच्या स्कोअरवर ३ गडी गमावूनही मधल्या फळीतील फलंदाजांनी संघाला २४९ धावांपर्यंत नेले आणि त्यानंतर वरुण चक्रवर्तीच्या पाच विकेट्सच्या जोरावर संघाने न्यूझीलंडसारख्या बलाढ्य संघाचा २०५ धावांवर पराभव केला.

भारताच्या फिरकी चौकडी चक्रवर्ती, कुलदीप यादव, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांनी न्यूझीलंडविरुद्ध नऊ बळी घेतले. त्याने ३९ षटकात १२८ डॉट बॉल टाकले. केन विल्यमसन सारख्या धीरगंभीर फलंदाजानेही अक्षर पटेलसमोर संयम गमावला आणि तो केएल राहुलच्या स्टंपिंगचा बळी ठरला.

### चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत वरचढ

**भारत – ऑस्ट्रेलिया हे दोन संघ आतापर्यंत वनडे फॉरमॅटमध्ये एकूण १५१ वेळा आमने सामने आले आहेत. यापैकी ८४ सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला आहे तर ५७ सामन्यात भारताने ऑस्ट्रेलिया विरुद्ध विजय मिळवला आहे. तर यापैकी १० सामने हे अनिर्णित राहिलेत. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये यापूर्वी भारत आणि ऑस्ट्रेलियात तीन सामने झाले, यापैकी दोन सामन्यात भारताचा तर एका सामन्यात ऑस्ट्रेलियाचा विजय झाला.**

### ...तर भारत फायनलमध्ये पोहोचणार

**२०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पावसाचे आणि ऑस्ट्रेलियाचे वेगळेच नाते आहे. गेल्या दोन हंगामामध्ये ऑस्ट्रेलियाचे ३ सामने पावसामुळे वाया गेले. यावेळीही पावसामुळे ऑस्ट्रेलियाचा एक सामना होऊ शकला नाही. अशा परिस्थितीत चाहत्यांच्या मनात अशी भीती आहे की, जर सेमीफायनलमध्ये असेच काही घडले, तर कोणत्या संघाचे नुकसान होईल. यावेळी आयसीसीने दोन्ही उपांत्य सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवला आहे. पण नियोजित तारखेला खेळ पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. जर हे शक्य नसेल, तर राखीव दिवशी सामना जिथे थांबवला होता तिथून सुरू होईल. म्हणजेच जर भारत–ऑस्ट्रेलिया उपांत्य सामना ४ मार्च रोजी पूर्ण झाला नाही, तर ५ मार्च हा राखीव दिवस म्हणून वापरला जाईल. त्याच वेळी, डकवर्थ लुईस नियमांनुसार, नंतर फलंदाजी करणाऱ्या संघाला निकाल मिळविण्यासाठी किमान २५ षटके खेळावी लागतील. गट टप्प्यात, दुसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या संघाला फक्त २० षटके खेळावी लागतात. पण जर राखीव दिवशीही सामन्याचा निकाल लागला नाही, तर गट टप्प्यात अव्वल स्थानावर असलेला संघ अंतिम फेरीत पोहोचेल. तुम्हाला सांगतो की, भारतीय संघ गट टप्प्यात अव्वल स्थानावर होता. अशा परिस्थितीत जर सामन्याचा निकाल लागला नाही तर भारत अंतिम सामना खेळेल.**

### संभाव्य प्रतिस्पर्धी संघ

**भारत : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (विकेटकीपर), हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती.**

**ऑस्ट्रेलिया : ट्रॅव्हिस हेड, कूपर कॉनोली, स्टीव्ह स्मिथ, मार्नस लॅबुशेन, जोश इंगलिस, ॲलेक्स केरी, ग्लेन मॅक्सवेल, स्पेन्सर जॉन्सन, बेन द्वारशुइस, नॅथन एलिस, ॲडम झांपा**

दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाचा सर्वात कमकुवत मुद्दा म्हणजे त्यांच्याकडे एकमेव स्पेशलिस्ट स्पिनर डम झाम्पा आहे. दुबईच्या संथ खेळपट्ट्यांमध्ये वेगवान गोलंदाजांना विशेष काही मिळण्याची आशा नाही. कांगारूंना ग्लेन मॅक्सवेल आणि ट्रॅव्हिस हेड या अर्धवेळ फिरकीपटूंवर अवलंबून राहावे लागेल. वासराच्या दुखापतीमुळे मॅथ्यू शॉर्ट बाहेर आहे. ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी इंग्लंड आणि अफगाणिस्तानविरुद्ध ३५२ आणि २%३ धावा दिल्या. अशा परिस्थितीत विराट कोहली, रोहित शर्मा, श्रेयस अय्यर आणि शुबमन गिल यांचे आव्हान त्यांच्यासाठी खूप कठीण असेल.






RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 180 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .